# आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या सॉफ्ट पॉवरची भूमिका

**डॉ. गणेश गिरी**

सहाय्यक प्राध्यापक (राज्यशास्त्र विभाग)

★★★

एच.पी.टी. आर्ट्स अँड आर.वाय.के. सायन्स कॉलेज, नाशिक.

**गोषवारा**— आंतरराष्ट्रीय राजकारणात जगातील प्रत्येक राष्ट्र आपली प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न करताना दिसते आहे. याचे दोन मार्ग आहे, एक म्हणजे स्वतःचे लष्करी व आर्थिक सामर्थ्य व दुसरे म्हणजे स्वतःकडील सकारात्मक संसाधने. यापैकी कोणत्या मार्गाचा अवलंब करुन आपले जागतिक वर्चस्व प्रस्थापित करावयाचे हे राष्ट्र निश्चित करते. पहिल्या मार्गाचा अवलंब वेगवान असतो व त्याचे परिणाम तात्काळ दिसायला लागतात परंतु हा मार्ग फार काळ आंतरराष्ट्रीय राजकारणात टिकून राहिलेला नाही हा आजवरचा अनुभव आहे. तथापि दुसरा मार्ग हा संथ असला तरी त्याचा परिणाम दीर्घकाळ टिकून शाश्वत विकासास साह्यभूत ठरतो. भारताने अहिंसा, पंचशील तत्वे व अलिप्ततावाद यांचा स्वातंत्र्यानंतर व जागतिकीकरणाचा भारतात प्रवेश होईपर्यंत या साधनांचा उपयोग सॉफ्ट पॉवर म्हणून जागतिक राजकारणात वापरात आणला. जागतिकीकरणाने भारतावर दूरगामी परिणाम केल्याने वेगळ्या साधनांचा ज्यामध्ये चित्रपट, पर्यटन, आरोग्य, संस्कृती, योगा अशा अनेक आधुनिक साधनांद्वारे जागतिक स्तरावर उत्तम प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु केला. यामध्ये यश–अपयशाचा खेळ सुरु असला तरी भारताने आपले प्रयत्न सुरु ठेवलेले दिसतात, म्हणून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सद्यस्थितीमध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या सॉफ्ट पॉवरची भूमिका या विशयावर विविध अंगांनी चर्चा करण्याचे प्रयोजन आहे.

**प्रस्तावना** — अनेक दशकांपासून अभ्यासक व विश्लेशकांनी भारताच्या शक्तिशाली राष्ट्र होण्याच्या बाबत आपले मत मांडले आहे. भौतिक विकासाच्या अनुशंगाने प्रयत्न होत असताना आर्थिक, लष्करी वाढ व लोकसंख्येचा विस्तार या घटकांकडे कटाक्षाने लक्ष देण्याचे उदिष्ट निश्चित करण्यात आले. म्हणजेच भारताची ही भौतिक शक्ती (हार्ड पॉवर) वाढविण्याचे लक्ष निर्धारित झाले होते. आंतरराष्ट्रीय राजकारणात भौतिक शक्ती वाढविण्याचे प्रयत्न होणे आवश्यकच असते. परंतु याच शक्तीत वाढ करावी का? असा प्रश्न निर्माण होतो. केवळ एकल मार्गाने विचार व कृती करता दुसरा मार्ग मात्र दुर्लक्षित राहतो व त्याचे परिणाम किंवा इतर राष्ट्रांची आपल्याकडे बघण्याच्या भूमिकेत निष्चितपणे कुठेतरी नकारात्मकता येते. मग हा दुसरा मार्ग कोणता ज्याने आंतरराष्ट्रीय राजकारणात आपली अजून स्वच्छ प्रतिमा निर्माण होईल, असे नाही की भारताची आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रतिमा मलीन आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अनेक प्रमुख प्रश्नांमध्ये मध्यस्थ म्हणून भूमिका पार पडली आहे. पण भारताला एवढीच भूमिका घेऊन थांबणे हिताचे नाही. आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करताना आपले हितसंबंध जोपासत आपल्या सॉफ्ट पॉवरचा उपयोग करुन भारताकडे विष्वाचे नेतृत्व यायला निश्चितच अनुकूल वातावरण निर्माण होईल. परंतु भारताने या सॉफ्ट पॉवरचा उपयोग फारसा प्रभावीपणे केलेला दिसत नाही. व्यापार व राजकारण यापलीकडे जावून धर्म, संस्कृती, विविधता, खेळ, आरोग्य, तंत्रज्ञान, चित्रपट अशा अनेक सॉफ्ट पॉवर संसाधनांचा उपयोग भारताने मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणातील मोठा स्पर्धक व शेजारी असणारे चीन सारखे राष्ट्र याच्या बरोबरीने उभे रहावयाचे असल्यास व त्याला शह देण्यासाठी भारताला मानवतावादी सॉफ्ट पॉवरचा उपयोग अतिशय योग्यपणे करता येईल जो कि चीनच्या विस्तारवादी धोरणांना खीळ बसविण्यास सहाय्यभूत ठरेल.

**संशोधन विषय**— आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या सॉफ्ट पॉवरच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

**गृहीतके** — आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या सॉफ्ट पॉवरची भूमिका मर्यादित स्वरुपाची असलेली दिसते.

**निष्कर्श शब्द**— आंतरराष्ट्रीय राजकारण, सॉफ्ट पॉवर, भारत, योगा, संस्कृती, चित्रपट

**संशोधन पद्धती**— प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासाकरीता पुस्तके, मासिके, वेबसाईट, वर्तमानपत्रे अष्या दुय्यम साधनांचा आधार घेऊन ऐतिहासिक विश्लेशणात्मक पद्धतीने तथ्य विश्लेशण करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर शोधनिबंधाचा अभ्यासविषय राज्यशास्त्राच्या आंतरराष्ट्रीय राजकारण या विद्याशाखेच्या परीघामध्ये येतो.

**सॉफ्ट पॉवरचा अथ**—जोसेफ नै यांच्या मते,"तुमचे राष्ट्र स्वतःच्या इच्छा–आकांक्षा दुसऱ्या राष्ट्रांवर लादून स्वतःचे उदिष्ट साध्य करण्याचे माध्यम म्हणजे सॉफ्ट पॉवर होय. यामध्ये उदिष्ट साध्य करण्यासाठी सैनिकी, आर्थिक अश्या कोणत्याही शक्तींचा उपयोग करण्याची आवश्यकता नसते, परराष्ट्र धोरण, राजकीय व्यवस्था–मूल्य व संस्कृती हे तीन मुख्य आधार सॉफ्ट पॉवरचे आहेत." परराष्ट्र धोरणाची उदिष्टे साध्य करण्यासाठी व देशाच्या सर्वांगीण प्रगतीला प्राथमिकता देण्यासाठी आधुनिक काळातील आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्वाची भूमिका पार पाडणारे व राष्ट्राची क्षमता निश्चित करणारे साधन म्हणून सॉफ्ट पॉवरचा अर्थ लावता येतो.

द्विपक्षीय किंवा बहुपक्षीय राजनयामध्ये व्यापक अर्थाने राष्ट्राच्या क्षमतेला प्रदर्शित करणारे एक महत्वाचे साधन म्हणून परराष्ट्र धोरणामध्ये याची भूमिका केंद्रस्थानी येताना दिसते. याचे कारण असे की, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा, आरोग्य, मनोरंजन, तंत्रज्ञान यासारखे त्याचे अनेक आधार आहेत जे की मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास करुन सुरक्षितता प्रदान करण्यास सहाय्यभूत ठरतात. यांचा उपयोग इलेक्ट्रॉनिक माध्यमे, समाज माध्यमे व प्रत्यक्ष भेटीच्या माध्यमातून अशा अनेक सार्वजनिक व्यासपीठांवरून करता येतो.

देशाच्या मुत्सद्देगिरीला महत्व प्राप्त करून देण्यासाठी वेगवेगळ्या मार्गांनी देशाच्या कल्पनांचा प्रसार–प्रचार (ब्रॅण्डिंग) केल्या जातात. शासन प्रकार, संस्कृती, शिक्षण, विविध नवनिर्मिती अशा स्वतःच्या उत्तम वैशिष्ट्यावर जोर देऊन सॉफ्ट पॉवर निर्माण केली जाते. यामध्ये राष्ट्रीय उदिष्ट साध्य करण्यासाठी सार्वजनिक व खाजगी स्त्रोतांचा नाविन्यपूर्ण वापर केला जातो. एकंदरीत आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्णय प्रक्रिया आपल्या दृष्टीने अनुकूल, तसेच स्वराष्ट्राची प्रतिमा उंचावण्याचा देखील प्रयत्न केला जातो.

**परराष्ट्र धोरणामध्ये भारताच्या सॉफ्ट पॉवरची साधने**

१) संस्कृती भारताची संस्कृती हि अतिशय प्राचीन व विविधतेने नटलेली सर्वात लोकप्रिय अशी संस्कृती आहे. भारताचे हेच साधन भारताची सकारात्मक प्रतिमा तयार करण्यास महत्वाची भूमिका पार पाडते. विषेशतः शास्त्रीय संगीत, भारतीय नृत्य, भाशिक विविधता, खाद्यसंस्कृती व विविधपूर्ण पोशाख हे सर्व घटक परराष्ट्रधोरण निश्चित करताना प्रभावी ठरतात. हिंदू, जैन, बौध्द व शीख या भारतातील धर्मांचा प्रभाव शेजारी राष्ट्रांवर पडला आहे. विषेश म्हणजे कोणत्याही लष्करी हल्याशिवाय या धर्मांचा प्रसार इतर राष्ट्रांमध्ये सहजपणे झालेला दिसतो. तसेच इस्लाम, ख्रिश्चन व यहुदी या धर्मियांचे देखील अनुयायी मोठ्या प्रमाणात भारतात आढळतात.

२) चित्रपट भारतीय चित्रपट सृष्टी इतर कोणत्याही चित्रपट सृष्टीपेक्षा अधिक वैशिष्टपूर्ण आहे, कारण भारतीय समाज, संस्कृती, धर्म अशा विविध विषयानुसार चित्रपटांची निर्मिती केली जाते. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिमा उंचावण्यामध्ये भारतीय चित्रपट सृष्टीची भूमिका महत्वपूर्ण राहिलेली दिसते. विविध भारतीय भाषांमध्ये चित्रपट निर्मिती होते. मध्य व पश्चिम आशिया राष्ट्रांमध्ये भारतीय चित्रपटांना पसंती दिली जाते. पाश्चिमात्य देशांमध्ये देखील भारतीय चित्रपट स्वःताची ओळख निर्माण करत आहेत. भारताचे माहिती व प्रसारण मंत्री श्री. प्रकाश जावडेकर यांनी राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार कार्यक्रमप्रसंगी म्हटले होते की, कोणत्या देशाची संस्कृती व कला या त्याच्या शक्ती असतात व या शक्ती जगासमोर सादर करण्याचे प्रभावी साधन म्हणजे चित्रपट आहेत, यासाठी चित्रपट सृष्टीने सतत प्रयत्नशील असले पाहिजे. जगभरात भारतीय चित्रपटांना पसंती दिली जाते. लॅटिन अमेरिकेतही भारतीय चित्रपटांना मोठी मागणी असल्याचे त्यांनी सांगितले.

३) योगा योगा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे, याचा उल्लेख करणे आवष्यक आहे कारण हा घटक भारतीय परराष्ट्र धोरणाचा सॉफ्ट पॉवर म्हणून त्याचा प्रत्यक्षपणे वापर सुरु झाला आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सभेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योगा हे भारतीय संस्कृतीने जगाला दिलेली मोठी देणगी आहे असे स्पष्ट केले. ब्रिक्सच्या पहिल्या बैठकीमध्ये भाग घेण्यासाठी गेलेले परराष्ट्रमंत्री श्री. सिंग यांनी नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचा संदर्भ देत अधोरेखित केले की, योगामुळे शरीर व मन यांच्यावर सकारात्मक परिणाम होताना दिसतो. म्हणूनच २१ जून हा जागतिक योगा दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. आज जवळपास १७७ राष्ट्रांनी योगाला मान्यता दिली आहे. त्यामुळेच हे एक नवीन साधन परराष्ट्र धोरणामध्ये सॉफ्ट पॉवरची भूमिका पार पडताना दिसते.

४) पर्यटन भारतीय संस्कृती व पर्यटन परस्परसंबंधीत आहेत. प्राचीनकाळापासून विविध धर्मियांच्या कला व संस्कृतीमधून पर्यटन क्षेत्र आकाराला आहे. याच्याशी संबंधित हॉटेल व टुर्स–ट्रॅव्हल हे व्यवसाय देखील भरभराटीला आले आहेत. सन २०३० पर्यंत भारत पहिल्या पाच स्थानामध्ये येईल व जागतिक पातळीवर पहिल्या पाच व्यावसायिक ट्रॅव्हल मार्केटमध्ये स्थान मिळवेल अशी अपेक्षा आहे.

५) लोकशाही भारतीय लोकशाही जगातील मोठी लोकशाही व्यवस्था म्हणून नावापास आली आहे. तिसऱ्या जगातील बहुतांशी राष्ट्रांमध्ये राजकीय व्यवस्थांचे उच्चाटन होत असताना याच जगातील भारताने मात्र आपली लोकशाही व्यवस्था व मूल्ये टिकवून तिला सशक्त करण्याच्या मार्गाने वाटचाल चालू ठेवली आहे. सर्वांना मतदानाचा हक्क, विशिष्ट कालावधीनंतर नियमित निवडणुका, शासनाच्या निर्णय व धोरणांचे समर्थन व टीका करण्याचा हक्क, स्वातंर्त्य, समता, न्याय या लोकशाही मूल्यांची कमी–अधिक प्रमाणात जोपासना व अंमलबजावणी. तसेच महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अश्या महान तत्ववेत्ता यांचे तत्वज्ञान जगमान्य झाले आहे.

वरील महत्वपूर्ण साधनांबरोबरच क्रिकेट, आयुर्वेद, इस्त्रो, आरोग्य व शिक्षण यासारखी अनेक साधने भारताची सॉफ्ट पॉवर सक्षम आणि तिचा प्रसार–प्रचार करण्यास महत्वाची भूमिका पार पडत असून आंतरराष्ट्रीय राजकारणातील सकारात्मक प्रतिमा उंचावण्यास नक्कीच हातभार लावत आहेत.

सध्याच्या कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर देखील भारताने आपली आंतरराष्ट्रीय पातळीवरील भूमिका मानवतावादी दृष्टीकोनातून प्रकाशझोतात आणली आहे ती अशी की, भारताने ८० पेक्षा अधिक देशांना करोना लशी व वैद्यकीय साहित्य पुरविले आहे. भारताने 'व्हॅक्सिन मैत्री' नावाने पुढाकार घेत लशींचा व साहित्याचा पुरवठा केला आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताची सॉफ्ट पॉवर उपयोगात आणण्याच्या मर्यादा भारताकडे सॉफ्ट पॉवरची अनेक साधने उपलब्ध आहेत,

तथापि या साधनांचा योग्य तसा उपयोग भारत अजूनही मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय राजकारणात करत नाही. वर्तमान परिस्थितीमध्ये भारत एक शक्तिशाली राष्ट्र निर्मितीमध्ये प्रयत्नशील असताना षेजारी राष्ट्रे व विकसित राष्ट्रे यांच्याशी संबंध प्रस्थापित करताना भारताची भूमिका संवेदनशील वातावरणातून जाताना दिसते. जागतिक बदलाच्या दिशेने भारताच्या परराष्ट्र धोरणाचे स्वरूप देखील बदलत चालले आहे. सॉफ्ट पॉवर म्हणजे केवळ प्रतिमा स्वच्छ करणे ऐवढाच मर्यादित अर्थ नाही त्याहीपुढे जाऊन स्वतःचा सर्वांगीन विकास व जगाच्या दृष्टीकोनात सकारात्मकता, विश्वास निर्माण करणे असा व याहीपेक्षा व्यापक अर्थ यामध्ये अभिप्रेत आहे. सुरवातीला चर्चा केलेल्या साधनांचा पुनर्विचार करताना त्या साधनांचा मर्यादित वापर आपणाकडून कसा होतो हे स्पष्ट होते जसे की, संस्कृती बाबतीत आपण त्याचा व्यापक अर्थाने प्रसार–प्रचार करण्यास कमी पडलो. ज्या पद्धतीने आपण पाश्चिमात्य संस्कृतीचा स्वीकार कोणताही विचार न करता करतो तेच मात्र आपली संस्कृती आपल्याला मागास वाटते. जगातील बहुतेक सर्व धर्माचा वावर भारतात आहे. बौध्द धर्माची निर्मिती भारतात झाली असली तरी चीन सारखा शेजारी व बलाढ्य राष्ट्र त्याचा सॉफ्ट पॉवर म्हणून वेगाने करताना दिसतो. भारतीय चित्रपटांच्या बाबतीत देखील प्रश्न निर्माण होतो. हॉलीवूड चित्रपटांइतका खर्च, प्रसार–प्रचार इत्यादी बाबत जगातील लोकांना आकर्शित करण्याची क्षमता अशा अनेक बाबतीत भारतीय चित्रपट मागे राहिलेले दिसतात. जागतिक पातळीचा ऑक्सर पुरस्कार फार तर एखाद्या संगीतकारापुरता मर्यादित राहिला आहे. अजुनही मोठी बाजारपेठ मिळविण्यासाठी भारतीय चित्रपटांना वेळ लागेल असे वाटते. पर्यटनाच्या बाबत तर आणखीच चिंता वाटण्याचे कारण आहे, परदेशी पर्यटकांसाठी भारत सुरक्षित देश नाही असे एकंदरीत वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः परदेशी महिलांबाबत ही समस्या जास्त गांभीर्याने घेतली जाते. अतुल्य भारत सारखी मोहीम पण त्याचा फारसा सकारात्मक परिणाम होतांना दिसत नाही.

भारतीय संस्कृती–मूल्य याच्याशी निगडीत असणारी पर्यटन स्थळे यांना जागतिक पातळीवर प्रसिद्धी देताना भारतामध्येच अनेक प्रश्न उपस्थित केले जातात व या अंतर्गत वादाचे प्रसारण वेगाने होताना दिसते. भारतीय पुरातत्व विभाग अजूनही एका पारंपारिक चौकटीत काम करताना दिसतो. धार्मिक, भाशिक, प्रादेशिक, खान–पान यासारखी मोठी विविधता असणारा भारतासारखा देश दुर्मीळच असावा पण याच विविधतेच्या पडद्याआड असुरक्षित वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न भारतात सतत होताना दिसतो. भारतीय लोकशाहीच्या मॉडेलमध्ये धर्म, जात, प्रादेशिकता या मुद्दांवर आजही निवडणुका होतात, आणीबाणीचे गालबोट आधीच लागलेले असताना प्रखर राष्ट्रवादाच्या दिशेने वाटचाल होताना दिसते. २०२१ च्या जागतिक सॉफ्ट पॉवर इंडेक्सनुसार भारत ३६ व्या स्थानावर आहे. या अहवालामध्ये भारताच्या स्थानासंदर्भात स्पष्टीकरण देताना म्हटले आहे की. भारत जवळपास नऊ (९) ठिकाणी खाली आला आहे याचे मुख्य कारण म्हणजे देशातील निशेधाचे वातावरण, नागरी अशांतता किंवा असंतोष, साथीच्या रोगाने (कोविड–१९) आर्थिक नुकसान होण्याबरोबरच आरोग्यविशयक समस्यांना भारताला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे भारताच्या सॉफ्ट पॉवरच्या वाढीमध्ये व वापरामध्ये घसरण झाली आहे. सुरवातीला मांडलेल्या गृहितकाची पडताळणी वरील तथ्य विश्लेशणावरून केल्यास असे स्पष्ट होते की, गृहितकामध्ये बऱ्याच अंशी सत्यता आहे. निष्कर्श रूपाने म्हणता येईल की, यातील सर्वच साधने परिपूर्ण आहेत असे नाही प्रत्येक साधना मध्ये काहीतरी उणीव असणार परंतु भारताने या उणीवांचा फारसा विचार न करता त्यांच्या वापरावर वा अमंलबजावणीवर जास्त लक्ष द्यावे लागणार आहे. प्रथमतः भारताला आपल्या सॉफ्ट पॉवर बद्दल भारतीयांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. आपल्याकडे इतर राष्ट्रांचे लक्ष्य वेधण्यासाठी सुरक्षित वातावरणाची निर्मिती करावी लागेल ज्यामध्ये व्यापक लोकसहभाग असणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील व्यासपीठावरून भारतीय प्रतिमा उंचावण्याचा व सकारात्मक भूमिका मांडण्याचा सतत प्रयत्न केला जावा. तसेच या साधनांचा उपयोग जसा आंतरराष्ट्रीय स्तरावर केला जाणार आहे त्याचप्रमाणे भारतातील दारिद्रय, बेकारी, कुपोषण यासारख्या गंभीर समस्या सोडविण्यासाठी केला जावा. शांती संदेशाचा वाहक म्हणून आपल्या भूमिकेला व्यापक बनवावे. या सर्व साधनांच्या मदतीने भारताने स्वतःचा व जगाचा भविष्यकाळ सुखदायी करण्याचा प्रयत्न कटाक्षाने करावा.

**संदर्भ–**

१) *Blarel Nicolas .May&2012.] India: The neÛt Superpower\ India*s Soft Power: From Potential to Reality\ LSE Research online] London] UK] Page no- 28-*

२) *Nye Joseph .Feb- 2017.] Soft Power: The origins & Political Progress of a concept] www-nature-com] Palgrave Communication-*

३) *Yogendra Kumar] India*s Soft power as a Pillar of Foreign Policy] eoi-gov-in-*

४) *Rahman Hafijur.Feb-2018.] Soft Power in Indian Foreign Policy] Contemporary World: Policy] Politics & International Politics] Ullah Rahmat .ed-. & Hasan Sabbir .co- ed-.] Center for Research & Policy Studies] IKSAD Publishing House-*

५) *Cinema Soft Power of a Strong India: Prakash Javdekar] www-deccanherald-com-*

६) *Aneja Atul] India*s Soft Power gets Yoga boost] The Hindu] 20 June 2017] www-thehindu-com-*

७) *The Soft Power of Culture & Tourism: Report& www-PCW-in-*

८) *बातमी, महाराष्ट्र टाईम्स, ३० एप्रिल २०२१, फ्रंट पेज–०२.*

९) *www-jagranjosh-com]List of countries with the maÛimum soft power in the World&Global Soft Power IndeÛ 2021-*